प्याले व नंतर त्यांना सारख्या वांत्या सुरू झाल्या व त्यांचे शरीर नदीत पडले. लोकांनी धावून त्यांना बाहेर काढले पण त्यांचा आत्मा नर्मदा नदीत केव्हाच विलीन झाला होता! गुरुमंत्र घेतांना पूजेसाठी जे हार आणले होते ते त्यांच्या शवाला घालण्याचा दु:खद प्रसंग ओढवला. पूर्वीच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून त्यांचे शव तीन दिवस ठेवण्यात आले. जीवित होण्याचे काहीच चिन्ह दिसेना. तेव्हा 'पटकीने मृत्यु आला ' अशी नोंद करून शव पुरण्यास अनुज्ञा देण्यात आली.

### साई खेडयांत दादाजींचा निवास

यानंतर खांडोन भागात पुन: तेच जटाधारी मोठ्या दाढी मिशा असलेले 'रामफल दादाजी' लोकांना दिसू लागले. तेव्हां पुन: जागोजागीचे लोक त्यांच्या दर्शनास येऊ लागले. सिरसिरी गावचे मालगुजार त्यांना आपल्या गावी घेऊन आले. तेथे एका मुलाने दगड मारल्याने एक पक्षी मरून पडला. दादाजींना करुणा येऊन त्यांनी पक्ष्याला स्पर्श करताच तो जीवंत होऊन उडून गेला. या घटनेमुळे दादाजी अवतारी महात्मा असल्याचे लोकांच्या प्रत्ययास आले.

### साईखेडयांत दादाजीचा निवास

जवळच्या तुमडी गावाचे मालगुजार बन्सीधर दीनानाथ हे अत्यंत आर्थिक विपन्नावस्थेत होते. ते नित्य दादाजींच्या दर्शनास येऊन ऋणमुक्तीचे साधना बाबत विचारीत दादाजींनी सांगितले की शेतात तुर लाव. त्याने तसे केले. त्यावर्षी त्यांना इतके भरपूर पीक आले की , त्या मालगुजाराचे दैन्य संपले. कांही काळ दादाजी तुमडीच्या मालगुजाराकडेही राहिले.

साई खेडयांत या वेळी देवीची भयंकर साथ सुरू झाल्याने उंदीर-मांजराप्रमाणे मुले माणसे मरू लागली साईखेडयाचे शिवलाल पटेल दादाजींचें भक्त होते. त्यांचा मुलगा आजारी पडला तेव्हा पटेलाने दादाजींना पालखीत बसवून साईखेडयाला आणले. ही १९०७ इ. स. ची घटना आहे. साईखेड्याजवळून दुधी नदी वहाते. या नदीचे एक घागर पाणी मागवून दादाजी नी मुलाला आंघोळ घातली. थोडयाच काळांत मुलगा बरा झाला. या वेळेपासून साईखेड्याच्या लोकांना दादाजींच्या ईश्वरी शक्तीची जाणीव होऊन सर्व लोक त्यांची भक्ति भावाने सेवा करू लागले. साई खेड्याचे लोक त्यांना 'श्रीकेशवानंद सुकीर्ती तथा 'दादाजी धूनीवाले' या नावाने ओळखू लागले.

शिवलाल पटेलची बहीण जिजीबाईकडे दादाजींचा निवास होता. त्यांची स्थिति उन्मत्ता सारखी असे. कोठेही भटकणे, कांहीही खाणें , लहर लागेल तसे बोलणे ओरडणे, कोणाजवळची कोणतीही वस्तु हिसकावून घेणे वगैरे प्रकार करीत असत. कधी जिजीबाईच्या गाई चारावयास रानांत नेऊन संध्याकाळी परत घेऊन येत. कधी कोणाच्या घरावर चढून कवले काढीत व रस्त्यावरून जाणाऱ्यांना फेकून मारीत. कोणी अडविल्यास

त्याला दंड्याने मारीत. जिजीबाईच्या अंगणात एक बेलाचे झाड होते. कधी त्या खाली बसून 'मी शंकर आहे' असे ओरडत व मोठ्याने हसू लागत.

एक दिवस दादाजींच्या काही कृत्यामुळे संतापून जिजीबाईनें दादाजींना खूप झोडपले. दादाजींनी हे सर्व चुपचाप सहन केले. व हसत राहिले. त्या दिवशी रात्री जिजी-बाई झोपली असता तिचा पलंग सारखा हलू लागला. थोडावेळ तिने दुर्लक्ष केले. तो अधिक जोराने हलू लागला. तेव्हा ती घाबरली व दादाजींकडे धाव घेऊन त्यांच्या चरणा-वर पडली व क्षमा करण्यास विनवू लागली. पुढे ती त्यांना 'शंकर' मानून त्यांची नित्य पूजा व सेवा करू लागली.

### गढींत दादाजींचा दरबार

काही दिवसांनी गावाबाहेरील उध्वस्त झालेल्या किल्ल्याच्या गढीत दादाजी राहू लागले. एका चौथऱ्यावर टिनाचे छप्पर घालण्यात आले. जवळच धुनी सदा पेटलेली असे यातील फाटे दादाजींनी आपल्या हातांनी लावले ते सुरक्षित आहे. दादाजी रहात अस-लेल्या जागी त्यांनी एक खांब रोवला होता. त्यालाच टेकून ते बसत. जवळच एक मलखांब होता. लहरीप्रमाणे त्यावर ते मलखांब करीत. यामुळे त्यांना 'पहिलवान दादाजी' असेहि म्हणतात. जवळपास काहीं दुकाने लोकांनी सुरू केली.

दादाजीं समोर निरनिराळ्या प्रकारची फळे, पक्वान्ने, मिठाई भाविकांकडून येऊन पडत असे. पण गाकड, चटणी, व मुगाची खिचडी दादाजी फार आवडीने खात. या स्थानापासून मलमूत्र विसर्जनार्थ हि दूसरीकडे जाताना दादाजींना कधी कुणी पाहिले नाही. तथापि त्यांच्यापरिसरातील वातावरण नेहमी सुगंधी असे. दादाजी समोर आलेली कोणतीहि वस्तु धुनीत टाकली जाई. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवणाऱ्यास दंड्याचा प्रसाद व शिव्या मिळत. पण हा प्रसाद घेणाऱ्यांचे भाग्य उजळून जाई. जे भीतीने दूर रहात त्यांना ते हंसून म्हणत- "अबे मोडा ! आ चरण तो छू लेबेवे" (अरे मुला, या चरणानां स्पर्श तर करून घे ).

### 'श्रीहरिहरानंद तथा छोटे दादाजी

१९१६–१७ मध्ये राजस्थानांतील डिडवानच्या एका धनी पित्याचा 'भवंरलाल' नांवाचा तरुण पुत्र दादाजींकडे येऊन त्यांचे जवळ राहिला. हेच पुढे हरिहरानंद तथा छोटे दादाजी झाले. त्यांचे शरीर तेजःपुंज असे. हे गढीच्या मागच्या बाजूला रहात यांचे जवळही धूनी पेटलेली असे. गुरूच्या उग्र वृत्तीच्या उलट यांची वृत्ती शांत व प्रेमळ होती. यांचे कडेही अनेक लोक दर्शनास येत.

### साई खेडयाच्या दादाजींच्या मठातील खांबातून म. गांधीचे भाषण ऐकू आले.

१९२१ मध्ये मुंबईच्या चौपाटीवर म. गांधींचे भाषण सुरू होते. दादाजींनी जवळ बसलेल्या लोकांना सांगितले खांबातून कसला आवाज येतो तो पहा "एक व्यक्ति

कान लावून ऐकू लागली व म्हणाली "कोणी गांधी नावांचे पुढारी मुंबईत चौपाटीवर भाषण करीत आहेत. इतरही-लोकांनी खांबाला कान लावून ते भाषण ऐकलें ५०० मैल दूर असलेल्या साईखेडयात १९२१ मध्ये मुंबईतील भाषण ऐकावयास मिळाले हे केवढे आश्चर्य ! त्या काळात भारतात 'रेडिओ' कोणास माहितही नव्हता !

एकदा एक वैद्य पाऱ्याची बाटली खिशात ठेवून दादाजींच्या दर्शनास आला. दादाजींनी त्याच्या खिशातील बाटली काढून त्यांतील १०–१५ तोळे पारपिवून टाकला ! यामुळे झोपेच्या स्थितीत ते काही दिवस होते. पुढे ५–६ महिन्यानी त्यांच्या पायातून हा पारा फुटून निघाला. श्रीशंकरानी हालाहल विष प्राशन करून पचविले होते त्याचाच जणू हा प्रत्यय दादाजींनी दाखवून दिला.

## नारळातून नथ निघाली.

एक बाई नथ घालून दर्शनास आली व दादाजीचे पुढे तिने नारळ ठेवले. दादाजींनी तिच्याकडे नथ मागितली. तिने श्रद्धेने नथ काढून दिली. दादाजींनी नथ धूनीत टाकून तिला नारळाचा प्रसाद दिला व घरी फोडून खाण्यास सांगितले. घरी गेल्यावर नारळ फोडताच त्यातून तिची नथ बाहेर पडली. दुसऱ्या कुचेष्टेखोर बायांना ही घटना पाहून फार नवल वाटले ! त्यांपैकी एक बाई दूसरे दिवशी मुद्दाम नथ घालून दादाजींकडे आली. तिची नथ धूनीत टाकून तिलाही त्यांनी नारळ दिला. पण नारळ फोडल्यावर त्यातून बुक्का निघाला व त्या बाईची चांगलीच फजिती झाली ! 'भाव तसे फळ' याचा हा एक दाखला !

## काशीच्या ब्राह्मणाची फजीती

साईखेडयात वर्णसंकरात्मक धर्मकर्मरहित भ्रष्टाचार चालू आहे असे समजल्याने काशीचा ब्रह्मवृंद रागावला व त्यानी चार विद्वानांना दादाजींशी शास्त्र चर्चा करण्यासाठी पाठविले. ब्राह्मण गादरवाडा स्टेशनवर उतरले. स्टेशनावर प्रातर्विधि उरकून १५–१६ मैलांवरील साईखेडयाला जावे असा त्यांनी विचार केला. स्टेशनाबाहेरच्या मैदानात ते शौचासाठी बसले. इतर लोकहि तेथे शौचास जात असत. थोडयाच वेळात एक पोलिस अधिकारी तेथे आला. त्याने या चारही ब्राह्मणांना दरडावून त्याच स्थितीत पोलिस चौकीवर नेले व तेथील शिपायांस ते पुनः येईपर्यंत सांभाळण्यास सांगितले. १२ वाजेपर्यंत ते तसेच अशौच स्थितीत होते. दुसरा शिपायी कामावर आल्यावर पहिल्या शिपायाने ब्राह्मणांना दुसऱ्या शिपायाच्या स्वाधीन केले व अधिकाऱ्यांचा निरोप सांगितला. दुसऱ्या शिपायाला हे ऐकून नवल वाटले. कारण तेथील अधिकारी परगावी गेले होते. तेव्हा त्यांनी ब्राह्मणांना विचारले की कोठून आलात व कोठे जाणार आहात? ब्राह्मणांनी काशीहून आलो व साईखेडयाला कशासाठी जात आहोत ते सांगितले. तेव्हा शिपायी म्हणाला, "दादाजी महाराजांनीच तुम्हाला असे ठकविले ? दादाजींची ही रोजची लीला आहे." काशीचे ब्राह्मण साईखेडयाच्या दादाजींच्या दरबारात आले तो

दादाजी वेद ऋचा व उपनिषदें उच्चस्वरात स्पष्ट म्हणत होते. हे पाहून ब्राह्मण घाबरून गेले व दादाजींना शरण आले. दादाजींच्या रूपाने प्रत्यक्ष विश्वनाथाचे दर्शन त्याना तेथे झाल्याने त्यांना आपल्या क्षुद्र बुध्दीचा पश्चात्ताप झाला.

## श्रीमुरलीधर दुपल्लीवारांची गुरुभक्ति

श्री मुरलीधर राजेश्वर दुपल्लीवार हे वर्ध्याचे रहाणारे. वकीलीची पहिली परीक्षा पास झाले होते. २०–२१ वयात त्यांना क्षयासारखी दुर्धर व्याधी झाली. तेव्हा त्यांचे सासरे ननखीवाले त्यांना घेऊन साईखेड्याला येऊन राहिले. दुपल्लीवारांचा साधु संत व त्यांच्या लीलांवर विश्वास नव्हता. साईखेड्याच्या प्रत्येक बाबींकडे ते संशयाने पाहू लागले. पण एकाच आठवड्यात त्यांच्या प्रकृतीत सुधारणा दिसू लागली. त्यांना असे काही चमत्कार दिसले की ते श्रीदादाजींचे अनन्य उपासक बनले. त्यांना सर्वजण बडे भैया म्हणत.

एक दिवस दादाजींनी बडेभय्याच्या तोंडात भाकर व चटणीचे घास प्रेमाने भरले. प्रसाद मिळताच त्याच्या अंतःकरणात विलक्षण अनुभव येऊ लागले. त्यांना आपल्या शरीराचीहि शुद्धी राहिली नाही. द्वैत भाव जागृत झाला. दादाजींच्या दंड्याचा प्रसादही केव्हा केव्हा त्याना मिळे. एक दिवस तर दादाजींनी बडे भय्याला इतके बेसुमार मारले की, डोके फुटून रक्त आले व नंतर त्यांना एका खोलींत टाकून दिले. जिजीबाईनी समोर येऊन दादाजींना मारण्यापासून परावृत्त केले. सात दिवस बडे भैय्या खोलीत पडून राहिले. खाणे पिणें बंद होते. डोक्यात कीडे पडले. आठव्या दिवशी दादाजींनी त्यांस खोलीतून बाहेर काढले व चिमट्याने डोक्यावर मारण्यास आरंभ केला. पण काय आश्चर्य, किडे सर्व नष्ट झाले व जखमेचे घाव ही भरून आले.

दादाजी १९३० मध्ये समाधिस्थ झाल्यावर १९३६ मध्ये छोटे दादाजी श्रीहरिहरानंदाच्या उपस्थितीत हुशंगाबाद येथे पं. कुंजबिहारी मिश्रांच्या बगिच्यात ३० डिसेंबर रोजी रात्री ८॥ वा. बडे भय्याजीनी समाधि घेतली. दुसरे दिवशी त्यांचा देह नर्मदेत विसर्जित करण्यात आला.

## दादाजींच्या रूपात श्री साईबाबाचे दर्शन

हरद्याचे सदाशिवराव हे शिरडीच्या साईबाबाचे उपासक होते. ते नेहमी साईबाबांच्या दर्शनास जात असत. १९१८ मध्ये साईबाबांनी समाधि घेतल्यावर त्यांना फार दुःख झाले व आता साईबाबांचे दर्शन कसे होईल अशी त्यांना चिंता पडली. एका दिवशी साईबाबांनी सदाशिवरावांना स्वप्नात सांगितले की, माझा वास आता साईखेड्यात आहे. हे ऐकून ते साईखेड्याला आले व त्यांना दादाजींच्या ठिकाणी साईबाबांचे दर्शन झाले.

## संपत्ती हें विपत्तीचे मूळ.

दादाजींच्या वास्तव्यामुळे असंख्य लोक गरीबांपासून तो श्रीमंत शेठसावकारांपर्यंत भिकाऱ्यापासून ते मोठमोठ्या अधिकाऱ्यांपर्यंत साईखेड्यास येत व शक्तीनुसार दादाजींस भेट देत. त्यांना द्रव्य, भारी वस्त्रे, वा अलंकारादींचा यत्किंचित मोह नव्हता, पण काही भोंदू भक्तगणहि त्यांच्या भोवती जमा झाला. दादाजीं समोरील भेटीच्या वस्तूंचा अपहार होऊ लागला. दादाजी बद्दल त्यांना सादर भीति वाटत असे परंतु छोटे दादाजींना आपल्या कारस्थानाने बदनाम करण्याचा त्यांनी घाट रचला. तरुण सुंदर स्त्रियांकडून सेवा करवून त्यांना कुमार्गाला लावतात, असा त्यांचेवर आरोप करण्यांत आला. पोलीसमध्ये नोंद करवून त्यांचेवर खटला भरण्यात आला. यामध्ये दादाजींनाहि साक्षीदार घेण्याचे ठरविण्यात आले. दादाजी कोर्टात येणार नाहीत, म्हणून दादाजींना नरसिंगपूर येथे नेऊन त्यांच्या निवासस्थानी कोर्ट आले, पण दादाजींच्या शिव्या व दंड्याच्या आवाजाविना कोर्टास काही उत्तर मिळाले नाही. शेवटी पोलिसांनी मुकदमा काढून घेतला.

यानंतर साईखेड्यात पटकीची भयंकर साथ सुरू झाली व लोक पटापट मरू लागले. आता कारस्थानी लोक घाबरले व दादाजींना त्रास दिल्याचा हा परिणाम आहे हे त्यास कळून आले. तेव्हा लोकांनी छोटया दादाजींना शरण जाऊन दादाजींना साई-खेड्यास आणण्याची विनंती केली. फार आर्जवे केल्यावर दादाजी आले पण गढीतील पूर्वीच्या जागी जेथे १९०७ ते १९२८ पर्यंत राहिले होते तेथे न रहाता दुसऱ्याच ठिकाणी राहिले.

१९२९ च्या जानेवारीत एका मध्यरात्री दादाजी अकस्मात साईखेड्यातून निघून भोपाल संस्थानातील बुदनी येथे गेले. नंतर नेमावरला काही दिवस राहुन फिरत फिरत ते उज्जैनला आले. येथे सुमारे एक वर्ष राहिले. यावर्षी सूर्यग्रहण होते. क्षिप्रा नदीच्या रामघाटावर छोटे दादाजींनी यज्ञ, भंडारा व बराच दानधर्म केला.

## खांडवा येथे आगमन व निर्याण

उज्जैनहून १९३० च्या वैशाखात दादाजी बडवाह येथे गेले व ३–४ मास सेठ-सुंदरलालजींच्या धर्मशाळेत राहिले. येथे गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. यानंतर दादाजी अनुयायांसह खांडवा येथे आले. वृद्धावस्थेमुळे त्यांना विशेष हालचाल करणे अशक्य झाले. मार्गशीर्ष शु. ९ ला सायंकाळी दादाजींनी थोडी मुगांची खिचडी खाल्ली व थोडी भांग घेऊन रजई पांघरून निजून राहिले. दशमी ते द्वादशी तीन दिवस झाले तरी दादाजी जागे झाले नाहींत. रात्री एक सर्कल इन्स्पेक्टर आले व त्यांनी दादाजींच्या मृत्यूबद्दल चौकशी केली. अनेक दिवस झोपून राहण्याची दादाजींना सवय आहे असें सांगून इन्स्पेक्टरचे समाधान करण्यात आले. तो गेल्यावर शंका येऊन रजई दूर करताच दादाजींचा चेहरा कृष्णवर्णाचा व निश्चल असा दिसला हे पाहताच छोटे दादाजी मटकन खाली बसले. अशा रीतीने या महापुरुषाची जीवनयात्रा समाप्त झाली.

यानंतर दादाजी ज्या ठिकाणी पडले होते ती जागा घेऊन तेथे समाधि बांधण्यात

आली. हा मठ 'दादाजी दरबार' या नावाने चालू असता सन १९३६ मध्ये काही विघ्न-संतोषी लोकांच्या कारवायामुळे येथील मठात १५०–२०० स्त्री पुरुष रात्रीचे आरती करत असता सशस्त्र पोलिस दलाने येऊन अकस्मात लाठीमार व गोळीबार सुरू केला व सर्व आश्रमवासियांना जखमी स्थितीत अटक करून पोलिस चौकीत नेण्यात आले. कोर्टात हा खटला बरेचदिवस चालून हुशंगाबादच्या कोर्टाने या घटनेबद्दल पोलिसांवर चांगला ठपका ठेऊन सर्वांस निर्दोष मुक्त केले.

## नागपूरात 'केशवानंदआश्रम'

नागपूर येथे नाईक रोडवर श्रीशंकरानंद (पूर्वाश्रमीचे (अनंत नीळकंठ दिघे) यांनी दादाजी धुनीवाले यांच्या स्मृत्यर्थ श्रीकेशवानंद आश्रमाची स्थापना केली. श्रीशंकरानंदांचा जन्म १९११ मध्ये अनंत चतुर्दशीला ऐतिहासिक दिघे कुलात पित्याच्या मृत्यू नंतर ३ महिन्यानी झाला. घरची स्थिति गरीबीची असल्याने मातेने दुसऱ्यांकडे करून आपल्या दोन मुलांचे संगोपन केले. १२–१३ च्या वयात अनंतराव नागपूरच्या सरदार तात्यासाहेब गुजर यांचेकडे नोकरीस राहिले. लहानपणापासून त्यांचा साधूसंताकडे ओढा असून हिंदूसमाजाची सेवा करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती. साई खेड्याच्या दादाजी धुनीवाले यांच्या संबंधाने त्यांना फार आकर्षण होते. १९३० मध्ये त्यांनी समाधि घेतल्याचे कळताच अनंतराव यात्रेसाठी घरा बाहेर पडले. खांडव्याच्या समाधीचे दर्शन घेऊन ते हिमालयाच्या यात्रेस गेले. गंगोत्री, जन्मोत्री, त्रिजुगी नारायण, केदारनाथ केल्यावर ते तुंगनाथला आले. तुंगनाथच्या शिखरावर गेल्यावर सर्वत्र बर्फच बर्फ पसरलेला दिसला. तरी एका बर्फस्थानी एक झाड व त्याखाली एक साधु बसलेला त्यांना दिसला. उत्सुकतेने सोबत्यासह ते तेथे गेले. बर्फाच्छादित टेकडीवर सहसा वृक्ष वाढत नाही. तेव्हां वृक्ष पाहून त्यांस नवल वाटले. साधु दिगंबर असून तेजःपुंज होते. शेजारीच धुनी पेटलेली होती. साधूला वंदन करून बसले असता साधूने प्यावयास पाणी मागितले. अनंतरावांनी कमंडलूतील पाणी प्यावयास दिले. नंतर त्यांनी हा कमंडलु चांगला आहे, मला दे असे साधु म्हणाले, तेव्हा त्यांनी त्यास कमंडलु दिला. थंडीसाठी दोन पंचे साधूने मागितले. आपल्या पिशवीतील दोन पंचे काढून अनंतरावांनी साधूला दिले. साधूनी धुनीत हात घालून तीन वस्तु म्हणजे विभूति, स्मरणी व एक उजवा शंख या वस्तू काढून अनंतरावास दिल्या व म्हटले. भभूत को जगाना, स्मरणीसे स्मरना और शंखको बजाना या वस्तु घेऊन ते आपल्या स्थानी आले व आहार करून पुनः साधूचे दर्शन घ्यावे म्हणून शिखरावरच्या त्या स्थानी गेले. पण वृक्ष, साधु व धुनी सर्व अदृश्य झाले होते.

यात्रा संपवून अनंतराव नागपुरास आले व नंतर खांडव्याच्या दरबारला गेले.

यात्रा वृत्त ऐकून छेटे दादाजींनीं अनंतरावाना सांगितले, "दादाजी साक्षात शंकर भगवान आहेत. आता तुम्ही धुनी लावा व दादांच्या नावाची धून करा. दादाजी आपल्या भक्तांना कधी उपाशी ठेवीत नाहीत."

यानेहून नागपूरला आल्यावर दादाजींची पुण्यतिथि १०–१२–१९३२ ला होती. त्यापूर्वी ३–४ दिवस अनंतरावांच्या स्वप्नात तुंगनाथच्या स्वामींच्या भेटीचे दृश्य व ध्वनी झाला.

'भभूती को जगाना, स्मरणीसे स्मरना, शंखको बजाना"

तेव्हा १०–१२–१९३२ शनिवारी मध्यान्ही विव्दान ब्राह्मणांच्या हस्ते हिमालयांतील विभूतीवर 'नवचंडी यज्ञ' करून "श्री दादा दरबार" तथा "श्रीकेशवानंद आश्रमाची" स्थापना नाईकरोडवर नागपूर येथे करण्यांत आली.

पुढे १९४१ च्या दसऱ्यानंतर अनंतरावांनी कोकसरला श्रीगौरीशंकराच्या समाधीजवळ संन्यास दीक्षा घेतली तेव्हां 'शंकरानंद' अभिधान त्यांस प्राप्त झाले.

१९४१ पर्यंत आश्रमाचे कार्य शांत व धीमेपणे चालू होते. १९४१ मध्ये सहस्रचंडी याग व ११ जानेवारी १९४१ ते ३१ जानेवारी १९४३ पर्यंत 'श्रीअतिरुद्रयाग' मोठ्या समारंभाने करण्यात आला. या निमित्ताने हजारो रुपयांचा खर्च झाला पण तो सर्व दादाजींच्या कृपेने जनताजनार्दनाकडून उपलब्ध झाला हेही विशेष होय.

भारतीय नवयुवकांमध्ये सभ्यता व बुध्दिविकास व्हावा म्हणून १९४४ पासून आंतर्शालेय व आंतर्महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा केशवानंद आश्रमाच्या वतीने संयोजित करून फिरते कप (ट्रॉफी) ची बक्षिसे देण्यात आली. श्रीदादाजी पुण्यतिथीच्या दिवशी या स्पर्धा बिझाणी सिटी कॉलेजमध्ये घेण्यात येतात. तरुणांच्या शारीरिक विकासासाठी १९५६ पासून चांदीची श्रीकेशवानंद ढाल बक्षिसार्थ ठेवण्यात आली आहे. नागपूरच्या व्यायाम शाळेतील युवक हुतुतूच्या सामन्यात भाग घेतात व विजयी टीमला ही फिरती ढाल देण्यात येते.

दरवर्षी गुरुपौर्णिमा, श्रीदादाजी पुण्यतिथी उत्सव उत्साहपूर्वक संपन्न करण्यात येतात. वार्षिक उत्सवात हवन, पूजन, आरती, भजन, कीर्तन, प्रवचन, नामसंकीर्तन भंडारा (अन्नदान) आदि कार्यक्रम होतात.

१९४६ मध्ये स्वामी शंकरानंद हुशंगाबाद येथे श्रीदादाजींच्या प्रेरणेने अनुष्ठानार्थ गेले असता समाप्तीचे दिवशी नारळ वस्त्र व फूल कुंकू इत्यादींचे ताट नर्मदा तटावर पांचव्या पायरीवर ठेवले होते व नर्मदामाईचे स्मरण स्वामी करू लागले. १५–२० मिनिटांनी नर्मदेची लाट पाचव्या पायरीपर्यंत येऊन पूजासाहित्याचे ताट घेऊन गेली. हुशंगाबादच्या वकील व अन्य लोकांनी श्रीशंकरानंदाचा सत्कार करून त्यांस श्रीदादाचरण प्रकाश ही उपाधि प्रदान केली.

आश्रमाकडून शंकराचार्य, अन्य थोर महात्म्यांचा सत्कार अन्य धार्मिक, सामाजिक व जनसेवेची कार्ये करण्यात येतात.

# मी साईभक्त कसा झालो

**ले. वसंत लक्ष्मण गोखले**

साधारण, दीड दोन वर्षपूर्वीची गोष्ट आहे. मी रात्री वाचत पडलो होतो अन् मला गाढ झोप लागली. साधारण पहाटेच्या सुमारास मला स्वप्न पडले. स्वप्नात मी एका मोर्चा मध्ये सामील झालो होतो व माझ्या हातात एक झेंडा होता मोर्चा एक रेल्वे लाईन जवळून चाललेला होता. एकाएकी मला एक लहानसे घर दिसले त्याला कोणत्याही तऱ्हेचे देवळाचे स्वरूप नव्हते. परंतु बाहेरच्या बाजूस श्रीगुरुदेव लिहिले होते. मी झेंडा टाकून दिला व सहज म्हणून आत डोकावले. आत एका टेबलावर शाडूच्या तीन मूर्ती होत्या. पहिली मूर्ती श्रीनित्यानंदाची होती., दुसरी कोणाची होती ते मी ओळखू शकलो नाही व तिसरी मूर्ती श्रीसाईबाबांची होती. मुळात मी दत्तभक्त अक्कलकोट स्वामी (श्रीस्वामी समर्थ) व नृसिंह सरस्वती ही दैवते मानणारा आहे. परंतू मला मूर्ती मात्र वरील प्रमाणे दिसल्या. सर्वच साधू बद्दल मनात आदर असल्यामुळे मी अर्थातच सर्वांना नमस्कार केला. साईबाबांबद्दल मात्र मनात थोडासा किंतू होता कारण बाबांच्या नावावर लोकांना भूलथापा मारणारे एक दोघे जण मला माहित होते. मी तिघांना नमस्कार केला. दोन मिनिटे त्या स्थळी बसलो व निघालो. तेथील वातावरण फार पवित्र होते. मी परत नमस्कार केला बाहेर पडणार इतक्यात श्रीनित्यानंदांच्या व मधल्या दुसऱ्या मूर्तीने आपले शाडूचे हात हालवले त्या मूर्ती बोलल्या. मला म्हणाल्या "हमको" नमस्कार करता "है तुमारा काम वो (साईबाबा) है" मी म्हटले मी सर्वांनाच नमस्कार करतो. इतके म्हणून मी बाहेर पडलो. सकाळी जागा झालो तरी माझ्या डोळ्यां समोर स्वप्नातील प्रसंग तरळत होता. सहज म्हणून मी दुसऱ्या दिवशी माझे साडू श्री कृष्णराव गोखले (गावदेवी) ह्यांचेकडे गेलो होतो बोलता बोलता त्यांनी मला साईबाबांचे चरित्र वाचायला दिले. त्याच दिवशी त्यांचे कडे त्यांचे नातेवाईक श्री. सदानंद लेले आले होते त्यांनी मला बाबांचा एक फोटो दिला. मला ह्या घटनेचे मोठे आश्चर्य वाटले. मी घरी आलो आणि बाबांचे चरित्र वाचले मला अत्यंत समाधान झाले. मनांतील किंतू पार विरघळून गेला. नंतर मी दादर येथे साईनिकेतन मध्यें गेलो. मला तेथे बाबांचे दर्शन झाले उदी मिळाली. तेव्हा पासून मी बाबांचा पण भक्त झालो आहे. नुकताच मी शिरडीस दर्शनास जाऊन आलो. तेथील होणाऱ्या सर्व सोहळ्यांचा आनंद लुटला.

---

# १ तू नाचविशी २ रूप प्रभूचे

लक्ष्मीतनया

रे मर्त्य जिवा. शांत धरी, अंतर्मुखता
ते तुजसि गूढ, उमजवील ही अनंतता !
रे सोडू नको, ध्यान मनन, चिंतनातले
ते आसनस्थ आसहीन, बैठकींतले,
ऐहिक मोह सोड, तोड बंधनांतले,
लाभेल तदा, सांत जगांतून मुक्तता
ते तुजसि गूढ ॥१॥
तूं दरवेशी बघ बनशी जीवनांतला,
तूं नाचविशी या जगतीं, वासनास्वला,
तूं भुलून अता, जन-स्तुतीला. कर्म विसरला.
खेजर पूर्णत्वा प्रतिजाणें घे विरक्तता !
ते तुजसि गूढ ! ॥२॥
कर भजन, पूजन, स्तवन, ध्यान, लाव रे आता,
त्यज राग, काम, लोभ, मोह, शोक, क्षुब्धता.
मग विजय तुझा, प्राप्त होय इष्ट देवता,
दे चेतनाहि प्रेरणाहि, निर्विवादता
ते तुजसि ! ॥३॥
नका ऐकवू, छद्मी भाषण, कुचके जहरी बोल,
तीक्ष्ण हत्यारा समची करिती, हृदया जखमा खोल ॥
नाते कुठचे ? सगे सोयरे ? कोण कुणाचा कसले ?
सोय करी जो तोच सोयरा, नाते याशी जडले ! ॥
कुलवंताचे खानदानीचे, ऐका वदति त्यांचे,ते
सत्कृत्यांच्या, लौकिकांच्या, मागे धावती जे , ते ! ॥
पर्वा कसली, शरीर मनाची ? कीर्ति धनाचा ध्यास,
प्रीत दयेची, मानवतेची, दिनराती हव्यास ॥
रूप प्रभूचे, मानव धारी, संताचे या जगती,
पद-रज त्यांचे शिरी लागतां मानव पावन होती. ॥
कर्ण-व्दारें, प्राशन करि रे, अमृत वाणी त्यांची .
संतसमागम, घडतां वाटे, झाली भेट प्रभूची ! ॥
पिता प्रभूजी, माता भगिनी, बंधू सर्वही तूंची,
अद्भुत करणी, पाणी नारळीं. ही शक्ती देवाची ! ॥

# श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन

**पु. मु. अत्रे**

नंतर श्रीमहाराज हर्दा येथे आले. याचा मुख्य हेतु त्या विभागात रामनामाचा प्रचार व्हावा हा होता. आता तेथे राम मंदिराची स्थापना झाल्यामुळे लोकाना ते एक उपासनास्थान व विश्रांति स्थानही झाले होते. म्हणून श्रीमहाराजांनी सुमारे दीड वर्ष तिथे वास्तव्य केले. त्यात पुष्कळच लोक रामनामाजप करू लागले. येथेच साहित्य सम्राट तात्यासाहेब केळकर श्रीमहाराजांचे दर्शनास आले होते. त्यांचे वडील व ज्येष्ठ बंधु श्री महाराजांचे अनुग्रहीत होतेच.

काशीहून वाईला जाणाऱ्या एक बाई हर्द्याला महाराजांचे दर्शनाला आल्या व अत्यंत आश्चर्य चकित होऊन म्हणाल्या, "अगबाई, कालच मी या बोवांना प्रयागला गंगेच्या वाळवंटावर पाहिले !" मंडळी म्हणाली, "अहो काल तर ते येथेच होते." त्या उत्तरल्या, "ते मला माहीत नाही. पण यानांच मी पाहिले. " त्यावर महाराजांनी भाऊसाहेबांस विचारले, "तुम्हींच सांगा, काल मी कोठे तरी गेलो होतो का?" असे बोलून ते अर्थपूर्ण हसले.

तुम्ही स्वत: कधी रामनाम घेणारा ? जैशास तैसा भेटें :

वऱ्हाड प्रांतातले एक साधु काशीहून येताना श्रीमहाराजांचे दर्शनाला आले. सुख संवादात श्रीज्ञानेश्वरांची महती बोलताना श्रीमहाराज म्हणाले ," श्रीज्ञानेश्वर महाराज भगवंताचेच अवतार होते. कुरुक्षेत्रावर गीता सांगणारे भगवान कपडे बदलून ज्ञानेश्वरी सांगण्यास आले. बाकी फरक काहीं नाहीं" साधु म्हणाले, "आम्ही तर त्यांना आमची आई म्हणतो आमचे सगळे हट्ट ते पुरविजात आम्ही जर आज रेड्याला वेद म्हणण्यास सांगितले तर आई आमचा हट्ट पुरवील. कलियुगात खरोखर रामाची उपासना देखील अशा योग्यतेची नाही. " श्रीमहाराज शांत पणे प्रेमाने म्हणाले, "छे छे, आपण असे बोलू नये.रेड्याला वेद म्हणण्यास सांगण्याची योग्यता श्रीज्ञानेश्वर महाराजांचीच होती. ती परिस्थिति, त्यांचा हेतू त्यांचा अधिकार, इतकेच काय पण तो रेडा सुद्धा, हे सगळे निराळे होते. आपणास ते करणे शक्य नाहीं. "साधु आग्रहाने म्हणाले, "नाहीं कसे ?" आम्ही बरोबर रेड्याला वेद म्हणायला लावू, " हे त्यांचे आत्म प्रौढीचे निदागर्भ उत्तर ऐकून श्रीमहाराज म्हणाले, "मग तुमचा रेडा जर वेद म्हणेल तर आमचा कुत्रा 'राम राम म्हणेल," हे ऐकणाऱ्या मंडळींत एक हुषार पण नास्तिक व उपद्व्यापी वकील होता. त्यांनी दुसऱ्या दिवशी एक कुत्रा धरून आणला, दाराशी बांधला. श्रीमहाराजांना त्यांच्या साधुत्वाचे आव्हान दिले. श्रीमहाराज मनापासून हसून म्हणाले, "अहो, तुम्ही वकील खरे, पण प्रतिवादीची तपासणी वादीच्या पुराव्यानिशी तुम्हाला करता येत नाही. ! प्रथम त्यांच्या रेड्यानी वेद म्हटलें हा पुरावा दाखवून मग माझी तपासणी करा." वकीलाला हे पटले. तो त्या साधूकडे गेला व रेड्याने वेद म्हटल्याचे साक्षीदारांसह त्यांना सिद्ध करण्यास सांगितले. तेथे त्याची बाचाबाची झाली व तो परत आला. हे होई तो दिवे लागले. दारात तो बिचारा,उपाशी कुत्रा बांधलेला आणि रामासमोर

दोघाचा संवाद चाललेला असा तो केविलवाणा प्रकार होता. बोलण्याच्या नादात त्या वकिलास गुंतवून श्रीमहाराज म्हणाले, "अहो वकील साहेब तुमचा पुराणातील गोष्टींवर विश्वास आहे का ?" तो म्हणाला, "मुळीच नाही," श्रीमहाराज पुढे म्हणाले. "बरे नसू द्या विश्वास; पण रामायणात असे वर्णन आहे कीं, रामाने अंगदाला रावणाकडे शिष्टाई करण्यास पाठविले." येथेच श्रीमहाराजांना थांबवून वकील म्हणाला "अहो, पण माकड मनुष्यासारखे बोलणारच नाही, त्याचा राम अगदीं भगवंताचा अवतार असला तरी ! येथेच तुमचे वर्णन बारगळले !" श्रीमहाराज म्हणाले, "अगदी सत्य, म्हणा पण माकड माणसासारखे बोलणार नाही हें तुमचे म्हणणे तरी सत्य आहे ना ?" " वकील उत्तरला "अलबत " तेव्हा श्रीमहाराजांनी म्हटलें "'तुम्हीच म्हणता की चतुष्पाद प्राणी माणसासारखे बोलणार नाहीत. मग मला सांगा कीं कुत्रे 'राम राम'कसे म्हणेल ? आणि या बद्दल तुम्ही माझ्याशी हटून बसलात हे बरे नव्हे ! तुमच्या म्हणण्या-प्रमाणे रामाला देखील जे करणे शक्य नव्हते ते मला–रामाच्या दीन दासाला–तुम्ही करायला सांगता हे सरळ विचाराला पटत नाही. "वकील गडबडून बोलला. "बरे, हे कुत्र्याचे राहो. पण रेडा वेद बोलला हे तरी खरे का ?" श्रीमहाराज म्हणाले, "हे निश्चित आहे. पण ते आपण करू म्हटले तर आपल्याला श्रीज्ञानेश्वरमहाराजच झाले पाहिजे. ज्यांना भगवंताशी अनन्य होण्याची युक्ति साधली त्यांच्या हातून होणाऱ्या अनन्य साधारण गोष्टीची त्यांना माहिती देखील नसते आणि अमुक चमत्कार मी आता करतो असे म्हणून तेकां ही करीत नाहीत. असो. तो विकल्प वाद आतां राहूद्या, तुम्ही स्वत: कधी रामनाम घेणार ?" वकील नम्र होऊन म्हणाले, " महाराज आपण मला शिकवाल तेव्हा !" दुसऱ्याच दिवशी श्री महाराजांनीं त्याला अनुग्रह दिला.

काही तरी निमित्त काढून श्रीमहाराजांना हर्द्याहून नैमिषारण्यात एकटे जावयाचे होते पूर्वी ते भय्यासाहेब मोडकांना घेऊन गेले होते, पण लगेच मागे फिरले होते सन १९०५ साली ते वरचेवर नैमिषारण्यातून जाऊन आले याचे कारण श्रीमंत नाना साहेब यांची प्रकृति बिघडून ते क्षीण होत होते व त्यांचा अंत काळ नजीक येत आहे असे श्रीमहाराजांना खात्रीने वाटत होते. खरकटी भांडी घासण्यावरून ते आता एकदम रागावले व निघाले. तो दिवस २४ ऑक्टोबर १९०६ चा तिसऱ्या प्रहरी ४ वाजल्याचा होता. ते एकटेच नैमिषारण्यात गेले. श्रीशिवछत्रपतीनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या शेवटच्या पुरुषाचा अंतकाळ श्रीमहाराजां चे मांडीवर, त्यांनी तोडांत गंगा घालून १९०६ च्या ३०–३१ आक्टोबर किंवा १ नोव्हेंबर रोजी त्यांच्या वयाच्या ८२ व्या वर्षीं झाला. और्ध्वदेहिक व त्रिवेणी संगमात अस्थिविसर्जन सुद्धा त्यांच्याच करवी झाले. सन १८६० साली श्रीमंत नानासाहेबांना महाराजांनी अभय दिले होते. व 'अंतकाळी मी हजर राहीन असें वचनही दिले होते ते श्रीमहाराजांनी तंतोतंत पाळले. सुमारे वीस दिवसांनी ते हर्द्यास परत आले व तेथूनच गोंदवल्यास गेले.

———:o:———

# राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी

पा. रा. भाटीकार

राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी
आधिभौतिक शक्तीला
नामजपद्वारा
अध्यात्मिक शक्तीची जोड द्या !

आज आपल्या राष्ट्राची मोठी केविलवाणी स्थिति झाली आहे. अन्नासाठी त्याला इतर देशाच्या तोंडाकडे पहावे लागत आहे व दाही दिशा फिरावे लागत आहे. **"अन्न नाहीं वस्त्र नाही सौख्य नाही जना मधें। आश्रयो पहातां नाहीं बुध्दि हे रघुनायका।।** अशी समर्थांनी 'करुणाकांत' श्रीरामाजवळ मागितलेली मागणी आज परत मागणे अत्यावश्यक झाली आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्याला पाकिस्तान व त्यांचीमित्र राष्ट्रे (आंतून हिंदूस्थानचा उत्कर्ष सहन न होणारी ) यांजपासून धोका उत्पन्न झाला आहे. तर अंतःशत्रु निरनिराळ्या कारणानी राष्ट्राची अभेद्य एकजूट खिळखिळी करून टाकीत आहेत. पंथ, जाती, धर्म, राजकीय गट यांचे परस्परांविषयी गैर विश्वास मांडणे व हेवेदावे चालू आहेत! आज हा प्रदेश बंद, उद्या तो प्रदेश बंद, व यातून उत्पन्न होणाऱ्या हिंसाचारामुळे सार्वजनिक तसेच खाजगी मालमत्तेची मोडतोड, लुटालूट, जाळपोळ इत्यादि अनेक प्रकारचे अत्याचार लोकशाहीच्या (?) नावाने सर्रास चालले आहेत ! त्यामुळे आर्थिक घडी नीट बसविण्याच्या खाजगी व सरकारी सर्व प्रयत्नांना खीळ बसत आहे. हे पक्षाभिमानाच्या अभिनिवेशाला बळी पडलेल्या सुज्ञ म्हणणाऱ्या पुढाऱ्यांच्या सुद्धा लक्षात येत नाही, आपण या निर्बंध बंदमुळे देशाचे अधिक नुकसान करीत आहोत याच्याकडे त्यांचा कानाडोळा होतो आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ज्या विद्यार्थी तरुणांनी उद्या राष्ट्राचा भार शिरावर घेऊन त्याची सर्वांगीण उन्नती करून आपल्या राष्ट्राला जगात मानमान्यता मिळवून द्यावी तेच इतके बेशिस्त झाले आहेत कीं, ज्या गुरुंच्यासाठी व पवित्र विद्यामंदिरासाठी त्यांनी केवढाही त्याग करावा त्यांच्याच बद्दल कृतीने ते अनादर दाखवीत आहेत ! देशात बऱ्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून तो लहानापर्यंत , लाचलुचपत, सर्वप्रकारचा भ्रष्टाचार सर्वत्र बोकाळून राष्ट्राचेच स्थैर्य धोक्यात आले आहे. अर्थात नियमाला अपवाद या प्रमाणे देशात काही तरुणामध्ये सरकारी व खाजगी संस्थामध्ये आणि इतरत्र नीतिमान व आदर्श संस्था व मंडळी नाहीत असे नाही. पण स्वार्थाने प्रेरित झालेला अविवेक भ्रष्टाचार, हिंसाचार, राजकीय व्देष यांच्या प्रचंड लोंढ्यापुढे सात्त्विक वृत्तीचा पुरेसा प्रकाश पडत नाहीं हे कबूल केले पाहिजे. अशा नैतिक अधःपाताच्या परिस्थितीत देशाने आधिभौतिक प्रगति बरोबरच आध्यात्मिक शक्ति वाढविणे हे हिताचे ठरेल. त्या सर्व शक्तिमान परमेश्वराचे अधिष्ठान प्राप्त करून घेतल्या शिवाय देशात ऐक्य शांतता आणि सुख नांदणार नाहीं. 'सामर्थ्य

**आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे, परंतु तेथे भगवंताचे, अधिष्ठान पाहिजे,"** हे स्वानुभवाने समर्थांनी तसेच इतर थोर पुरुष व साधुसंतांनी कळकळीने सांगितले आहे. डॉ. राधाकृष्णन् सारखे जगन्मान्य तत्वज्ञ आपल्या प्रत्येक भाषणांत 'आध्यात्मिक मूल्यांवर भर द्या' असे जनतेला आवाहन करीत होते.

आपल्या पुराणात याबद्दल मोठे मार्मिक मार्गदर्शन केले आहे. दैत्य माजले, पृथ्वीवर पापाचा भार झाला म्हणजे पृथ्वी गाईचे रूप घेऊन म्हणजे दीन होऊन, ब्रह्मदेवाजवळ गाऱ्हाणे घेऊन जावयाची, ब्रह्मदेव सर्व देवांसह श्रीविष्णूपाशी जावयाचे व श्रीविष्णु आपण अवतार घेऊन दैत्याचा निःपात करून पृथ्वीवर शांतता आणि सुख यांची समृद्धी करीन असे आश्वासन देत व त्याप्रमाणे अवतार घेऊन दुष्ट प्रवृत्तींचा नाश करून सर्वत्र सात्त्विक प्रवृत्तींचा फैलाव करीत असत व या प्रमाणे जग सुखी होई. आज नेमकी हीच परिस्थिति आलेली आहे. देव व धर्म यांच्यावरचा आपला विश्वास उडत चालला आहे. लांचलुचपत, भ्रष्टाचार, वशिलेबाजी, अनीति, शरीराचे चोचले पुरविणे, आणि भल्याबुऱ्या मार्गांनी पैसा मिळविणे हेच बहुतेकांच्या आयुष्याचे ध्येय बनले आहे. त्यामुळे दैवी संपत्ति नष्ट होत आली आहे. ती वाढविणे हेच सांप्रतसगळ्या राष्ट्रीय रोगांवर एकमेव रामबाण औषध आहे. भगवद्‌गीतेत सोळाव्या अध्यायांत सांगितलेल्या दैवी संपत्तीच्या गुणांचा विकास झाल्यास भारतात 'रामराज्य' होण्यास वेळ लागणार नाही.

भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला दैवी संपत्तीसंबंधी सांगतातः—हे अर्जुना, दैवी संपत्तीला योग्य असलेल्या कर्म योग्यांच्या अंगी खालीलगुण आढळतात. धैर्य, अंतःकरणशुध्दी (शुध्द बुध्दि) ज्ञान विज्ञान पूर्वक कर्तव्य निष्ठा, (पात्रापात्र विचारपूर्वक) परोपकार इंद्रियनिग्रह, भगवदुपासना, वेदशास्त्राध्ययन, नियमितपणा, सरळ वर्तन, निष्कारण पीडा न देणे, सत्य भाषण, (विचार व उच्चार यांतील सुसंगति), न चिडणे, स्वार्थत्याग शांति, निष्कपटपणा, सर्वाभूतीं दया, निर्लोभता, (मनाचा) कोमलपणा, भिडस्तपणा, धीमेपणा, पाणीदारपणा, क्षमाशीलता धारणा, अंतर्बाह्य पवित्रता, व्देष बुध्दीचा अभाव आणि अहंमन्यता नसणे इत्यादि.

आज राष्ट्राला सुख समाधानाने जगण्यास वरील दैवी गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. साखळीचा पहिला दुवा ओढल्यास जशी सगळी साखळी ओढता येते, त्याच प्रमाणे 'भगवतनामाचा' आश्रय केल्यास वरील सर्व गुण धीरे धीरे आत्मसात होतात. म्हणून रामनामाचा भारत भर कोटयावधी संख्येने जप झाला पाहिजे. सर्व प्रकारच्या यज्ञामध्ये 'जपयज्ञाचे पुण्य' मोठे आहे असे भगवतांनी गीतेमध्येच दहाव्या अध्यायांत म्हणजे 'विभूतियोगांत' सांगितले आहे 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' हे सर्वांना माहित आहेच. त्यावर स्पष्टीकरण करतांना ज्ञानेश्वर माऊली म्हणाली आहे नाम जप यज्ञु तो परम। बाधूं न शके स्नानादि कर्म। नामें पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे ।।

**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि । भगवद्‌गीता अध्याय अ-१०**

नाम जपयज्ञु तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म ।नाम परब्रह्म वेदार्थे । ज्ञानेश्वरी अ.१० -२२३

'साधना माझी मुख्य शक्ती ।। त्यांत विशेषे नामकीर्ती । नामें चित्तशुध्दी । चित्तीं स्वरूपस्थिति साधकां ।। ६४७ । नामा परते साधन । सर्वथा नाहीं आन नामें। भवबंधच्छेदन । सत्य जाण उद्धवा । ६४८।।–एकनाथी भागवत अ. २३

' हरिनामाच्या चिंतने, बारा वाटा पळती विघ्ने, "

श्रीतुकाराम महाराज.

' नामें संकटे नासती । नामें विघ्नें निवारती। नामस्मरणें पाविजेती, उत्तम पदे दासबोध द. ४ स. ३'

'मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें । कृपा केलिया रघुनाथें । प्रचीती येते" दासबोध द. ६ स. ७

आपण या थोर व पुरातन राष्ट्राचे घटक आहोत हे आपले परम भाग्य आहे 'भारत खंडी नरदेह प्राप्ति है। तों परम भाग्यार्ची संपत्ती । तेथेंही जो विवेकु परमार्थी, त्याच वशवर्ती मी परमात्मा । असे भगवंतांनी उद्धवास सांगितल्याचे नाथ भागवतात नमूद केलें आहे. तेव्हा त्याच्या सर्वांगीण वैभवासाठी ज्याला जी व जशी सेवा करता येईल ती त्यांने करावी ते योग्यच आहे. महात्मा गांधींचा रामनामावर अलोट व अढळ विश्वास होता हे सर्वश्रुत आहे. म्हणून 'रामनाम जपद्वारा' राष्ट्रांतील आध्यात्मिक शक्ति वाढविणे व तद्वारा परस्पर प्रेमभाव व राष्ट्रीय ऐक्य साधणे हेच मुख्य काम आहे.

आपल्या मासिका तर्फे आपण तेरा कोटी रामनामाचा जप सुरू करण्याची खटपट करावी अशी विनंती करून व प्रभूने ज्ञानेश्वर माउलीने 'पसायदानांत' मागितलेले जगाचे कल्याण 'बहाल करून सर्वास सुखी ठेवावें असी त्या दयाघनाच्या चरणी याचना करून हे चार शब्द संपवितो

"श्रीकृष्णार्पणमस्तु" ।।

# शिरडी-वृत्त

फेब्रुवारी – १९७४

या महिन्यात साई दर्शनासाठी बाहेर गावच्या भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती काहीं कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती पुढील प्रमाणे :—

कीर्तन :– (१) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

(२) श्रीमती इंदिराबाई अयाचित, पंढरपूर,

(३) ह. भ. प. तुकाराम बुवा परदेशी, शिरडी.

प्रवचन –(१) श्रीमती ह. भ. प. संत हिराबाई देशमुख, आळंदी,

(२) ह. भ. प. लक्ष्मण म. रणदिवे, मुंबई.

भजन,गायन :–१) श्रीराम प्रासादिक भजन मंडळी, वसई,

(२) श्री. विठ्ठलराव ता. लबडे, नाशिक,

(३) श्री. एस्. के. दुबे आणि पार्टी, मद्रास,

(४) सालस परिपाठ भगिनी मंडळ, पुणें.

(५) आनंद साई भगवान भजन मंडळी, नागपूर,

(६) मिस्. मीराबाई एण्ड पार्टी, विजयवाडा,

(७) ह. भ. प अर्जुनराव सातपुते, अहमदनगर,

(८) श्री. अरुणकुमार चव्हाण, मुंबई.

जादूचे व शक्तीचे प्रयोग:–(१) जादूगार राजू डोडोया व पार्टी, लक्ष्मीवाडी, कोपरगाव,

(२) श्री. शिवाजीराव कार्लेकर व पार्टी, पंचवटी, नाशिक .

महाशिवरात्री कार्यक्रम :–(१) महाशिवरात्रीच्या दिवशी श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची फार गर्दी झाली होती. रिसिव्हर यांनी श्रींना संस्थान तर्फे महाअभिषेक केला. रात्री कीर्तनाचा कार्यक्रम झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गांवातून आल्यावर शेजारती झाली.

सन्माननीयांच्या भेटी :–(१) श्री. ए. के. फुकन, आय्. ए. एस्., मॅनेजिंग डायरेक्टर, मराठवाडा डेव्हलपमेंट कार्पोरेशन, औरंगाबाद. (२) श्री डी.डी.साठे,आय्. सी. एस्., मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (३) श्री. शरदराव केळकर, आय्. ए. एस्. जिल्हाधिकारी, नाशिक. (४) श्री. सुब्रम्हण्यम्, आय्. ए. एस्. अहमदनगर (५) श्री. विलासराव पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर. (६) श्री. पाटील, सिव्हिल जज्ज, कर्जत, कुलाबा. (७) श्री. चंद्रप्रभाप शेखर, उपअर्थमंत्री (म. प्र.) भोपाळ. (८) श्री. जैन, आय्. ए. एस्. जिल्हाधिकारी, सांगली.

शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई नाही. संपूर्ण महिना थंडी चांगली होती. थंडीच्या कडाक्यातही सर्व भक्तांना निवासस्थानाची गैरसोय संस्थानाने होऊ दिली नाही त्याबद्दल भक्तांनी संस्थेस धन्यवाद दिले.

# श्रीसाईनाथ रोजनिशी

## शके १८९६ (१९७४-७५)

गुढीपाडव्याच्या दिवशी इंग्रजी व मराठीत प्रकाशित झाली.

* श्रीसाईबाबांचे संग्राह्य तिरंगी छायाचित्र
* श्रीबाबांचे संक्षिप्त चरित्र
* श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीत काय काय पहाल
* श्रीबाबांचे समकालीन संत
* श्रीसाई समाजाचे संपूर्ण पत्ते
* श्रीबाबांचे बोल
* शिर्डीतील प्रमुख उत्सव, बाबांच्या आरत्या
* समाधिमंदिर, चावडी, द्वारकामाई व गुरुपादुकास्थान इत्यादींची आर्ट पेपरवरील छायाचित्रे

卐 श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे आश्रयदाते व आजीव सभासद यांना ही संग्राह्य रोजनिशी भेटी दाखल विनामूल्य पाठविली जाईल.

卐 श्रीसाईलीलेची पुढील चार वर्षाची वार्षिक वर्गणी एकदम भरणाऱ्यांना ही रोजनिशी विनामूल्य दिली जाईल.

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४



**मुद्रक : श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,

४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई-१५.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड

खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई, १४.



जात्यात दळली महामारी

मे

६० पैसे

१९७४

# अनुक्रमणिका (मे १९७४)


| | | |
|---|---|---|
| १ | संपादकीय — | |
| २ | श्री साईभक्तांची श्रद्धास्थाने, श्रीसाईधाम–२ | सदानंद चेंदवणकर |
| ३ | श्री साईनाथ महाराज ललित चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ४ | संत तुलसीदास | श्री. विनायक पाठक |
| ५ | स्मरण विस्मरण | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ६ | अनंतता | श्री. चिपळूणकर गुरुजी |
| ७ | तुझ्या दर्शना ओढ लागते | सौ. अनुपमा वखारे |
| ८ | श्रीराम गीतांजली | श्री. दिवाकर घैसास |
| ९ | आमचे कीर्तनकार श्री. अनंतराव आठवले | श्री. सदानंद चेंदवणकर |
| १० | श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| ११ | श्रीसाईतीर्थ प्रभाव | श्री. पी. एस. भुजबळ |
| १२ | तुझे रूप | श्री. तु. नाईक |
| १३ | झालो उतावीळ | श्री. रा. मा. आडकर |
| १४ | जात्यावरील गाणे | सौ. माई आडकर |
| १५ | देवा परत घे | प्रा. डॉ. श्रीराम पंडित |
| १६ | धुंदीत रंगुनी देहभान विसरावे | लक्ष्मीतनया |
| १७ | गुरु नानक गीतांजली | राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| | शिर्डीवृत्त | |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वा क्सु धा

गंगा समुद्रा भेटूं जाते । वाटेनें तापार्ता शीतल करिते ।
तीरींचे तरूंसी जीवन देते । तृषा हरिते सकळांची ॥२६॥
तैसीच संतांची अवतारस्थिति । प्रकट होती आणि जाती ।
परी त्यांची आचरिती रीती । पावन करिती जगातें ॥२७॥
कमालीची क्षमाशीलता । नैसर्गिक विलक्षण अक्ष्योभ्यता ।
ऋजुता मृदुता सोशिकता । तैसीच संतुष्टता निरुपम ॥२८॥
दिसाया जरी देहधारी । तरी तो निर्गुण निर्विकारी
निःसंग निर्मुक्त निज अंतरीं । प्रपंचीं जरी विचरला ॥२९॥
कृष्ण स्वयें जो परमात्मा । तोही म्हणे संत मदात्मा ।
संत माझी सजीव प्रतिमा । संत-सप्रेमा तो मीच ॥३०॥

श्री साईसच्चरित् –अध्याय ११ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५३ वे ] मे १९७४ [ अंक २

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए. पी, एचडी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी, एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

*

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पीन: ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

## संपादकीय

# आपल्याला खरोखरीच मोक्ष हवा असतो काय?

इसापनीतीत एक गोष्ट आहे,– अत्यंत हालअपेष्टांनी गांजलेला एक दरिद्री माणूस प्रार्थना करतो, "हे मृत्यो, तू आता आलास तर, किती बरे होईल ? माझी ह्या यातनांतून एकदाची सुटका तरी होईल." त्याची प्रार्थना मृत्यूने ऐकली! तो समोर आला व त्या माणसाला म्हणाला, " चल ! " त्यावेळी त्या माणसाची भीतीने बोबडी वळली. व तो गयावया करू लागला. म्हणताक्षणीच मृत्यू समोर आला तेव्हा त्याची मरणाची तयारी नव्हती.

अध्यात्माकडे वळणारे, धर्माकडे वळणारे बहुतांश लोक असेच कशापासून तरी सुटका करून घेण्यासाठी अंत:करणात तळमळत असतात. दु:खापासून मोक्ष व निरंतर सुखाची प्राप्ती ह्या दोन बाजू असलेले एक नाणे आहे. ते नाणे म्हणजे मुमुक्षा. येथून तेथून साधनेची सर्व धडपड ही कोणत्यातरी स्वरूपातील सुखासाठी असते. पण मोक्षासाठी बाह्य वस्तूंचा त्याग करू पाहणारे साधक, जगाकडे पाठ फिरविणारे संन्यासी व पूर्ण सुखमय मोक्षाची कल्पना उराशी धरणारे तपस्वी ह्यांना 'मुक्ती'च हवी असते असे नसून इच्छापूर्तीच हवी असते. आपल्यापैकी बहुतेकांची निवृत्ति मार्गाबद्दल अशीच एक कल्पना असते. आपण ऐकलेल्या, वाचलेल्या, अनुभविलेल्या प्रसंगातून आपण ती कल्पना साकार करीत असतो व मोक्षाविषयीही साचेबंद कल्पना मनात घोळवीत असतो. जे व्याख्येच्या पलीकडील आहे ते सुखमय असेल, इतकेच नव्हे तर इतर सर्व सुखांच्या पेक्षा उत्कट व चिरंतन सुखाचे स्थान असेल असाच निर्धार आपले मन करते. पण जर खरोखरीच्या मोक्षात सुखही नसले आणि दु:खही नसले तर असा मोक्ष आपणाला मिळावा असे वाटते काय ?

सुख आणि दु:ख यांच्या आपल्या कल्पना इंद्रियांच्या पलीकडे फारशा गेलेल्याच नसतात. अंत: परीक्षण करून पाहिले तर आपल्याला सुख हवे असते व दु:ख नको असते. पण प्रत्यक्षात सुखदु:खे वाटयाला येतच असतात. त्यांना समान लेखणे आपल्याला जमत नसते व म्हणून आपण चिरंतन काल्पनिक सुखाचे गुलाम होण्याचा प्रयत्न करीत असतो, असे दिसून येईल.

मोक्ष म्हणजे मिळविण्यासारखी, उपभोगण्यासारखी, इंद्रियांनी समजून घेण्या-सारखी अशी वस्तूच नाही. कारण अमूक एक म्हणजे मोक्ष असे आपण म्हणूच शकत नाही. आत्यंतिक सुखाचे निधान म्हणून आपण वैकुंठलोक, गोलोक, सत्यलोक, शिवलोक,

तुर्यावस्था, निर्वाण, ब्राह्मीस्थिती, कालातीतत्व, अलक्ष्य, निरंजन, सनातन, चिरंतन, वगैरे शद्बांचे टेकू लावून जे आश्रयस्थान मनात उभारीत असतो ते आपल्या आकांक्षांचे सूक्ष्म स्वरूपच होय. ते मिळविण्यासाठी आपण वास्तवाकडे पाठ फिरवीतच असतो. वास्तवाला सामोरे जाण्यास आपल्याला भय वाटते आणि या भयाच्या पायावर आपण आपल्या साधनेचा, अध्यात्माचा, मुमुक्षेचा, देवभक्तीचा डोलारा उभा केलेला असतो. पण ज्यांना भय वाटते त्यांच्यासमोर सुख-दुःखाचे द्वंद्वच असते. जेव्हा अंतर्बाह्य असे काहीच रक्षणीय असत नाही तेव्हा मन पूर्ण निर्भय असते. अशा निर्भयतेतूनच एखाद्या विचाराशी न गुंतता मन संपूर्ण, समर्थ, शांत, मुक्त व सर्वव्यापी होत असते. त्यात एकाग्रतेला समग्रतेची साथ असते. जे मन असे निर्भय होते तेच असे म्हणू शकते –

अणोरणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा ॥

आपणाजवळ अशी निर्भयता आहे काय ? आपल्या जवळची सुखदुःखे संपूर्ण-पणें एकाक्षणी सोडण्याची आपली तयारी आहे काय? असा मोक्ष त्या मृत्यूसारखाच क्षणोक्षणी आपल्यासमोर असतो. असा मोक्ष जे पाहातात ते म्हणतात —

"आपुले मरण पाहिले म्या डोळां।"

# झालो उतावीळ

आवडीने भक्ती धरली रे साई ॥
मनीचे द्वंद्वादिक दूरावे साई ॥
ऐसा मार्ग दावीं तूंच बाबा साई ॥
अंतरीचे ज्ञान मज कर साई ॥
हिच विनवणी तुमचे पायी ॥
भाव तेथें देव सांगती सकळ ॥
आतां बाबा सांग कां ? करशी वेळ ॥
झालो उतावीळ पुरव ही आस ॥

रा. मा. आडकर (बार्शी.)

श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने–२

# मुंबापुरीतील प्रती शिरडी–श्रीसाईधाम

लेखक : श्री. सदानंद चेंदवणकर



मुंबईत गिरगावात विठ्ठलभाई पटेल पथावर कॉंग्रेस हाऊसच्या अगदी जवळ श्री साईबाबांचे एक मंदिर आहे. हे मंदिर "श्री साईधाम" या नावाने ओळखले जाते. दर दिवशी येथे श्रीसाईभक्तांची गर्दी असते परंतु दर गुरुवारी येथे मुंबापुरीतले अनेक साईभक्त न चुकता श्री साई दर्शन करून जातात. हे श्री साई मंदिर आज ज्या ठिकाणी आहे त्या वाडीस एकावेळी दुआर्ट वाडी असे नाव होते पण आज बाबांच्या वास्तव्याने त्या वाडीचे नाव बदलले जाऊन 'साईधाम वाडी ' असे कायम नाव पडले आहे.

'साईधाम' ही संस्था डिसेंबर १९५२ मधे मुंबईतील एक विख्यात शिल्पकार श्री. बाळाजी वसंत तालीम यांच्या 'तालीम आर्ट स्टुडिओ' मधे मुंबईतील काही साई-

भक्तांच्या प्रयत्नाने स्थापन झाली. हा स्टुडिओ आजही या साई धामच्या अगदी जवळच आहे. या संस्थेच्या आद्य प्रवर्तकांमधे शिर्डीच्या साईबाबांचे एक निष्ठावंत सेवक, कार्यकर्ते व प्रसारक श्री. केशवराव भोळे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. तालीम आर्ट स्टुडिओच्या परिसरात एक औदुंबर वृक्ष आहे. औदुंबराच्या खाली भगवान श्री दत्तात्रेयांचे निवासस्थान असते अशी दत्तभक्तांची श्रध्दा आहे. श्री साईबाबा हे श्री दत्तात्रेयाचे अवतार आहेत अशी साई भक्तांची गाढ श्रध्दा आहे. या वृक्षानजिक, मुंबईच्या साईभक्तांच्या सोयीकरिता, दर्शन–सुलभतेकरिता मंदिर बांध, असा दृष्टांत मंदिराचे पहिले पुजारी श्री केशवराव भोळे यांना झाला. हा दृष्टांत त्यांनी आपल्या इष्टमित्रांना साईभक्तांना व तालीम स्टुडिओचे चालक श्री. तालीम यांना सांगितला. बाळाजीरावांनाही कल्पना पसंत पडली. त्यांनी थोडासा पुढाकार घेतला; व जागेच्या मालकाने परवानगी दिल्यास मंदिर तिथे उभारावे असे तालिम स्टुडिओत भरलेल्या पहिल्या सभेत ठरविण्यात आले. आनंदाची गोष्ट ही की जागेचे मालक श्री. भाऊसाहेब तालीम यांनी भुईभाडयाने ही जागा आद्य प्रवर्तकास काही अटींवर देण्याचे मान्य केले. मंदिर बांधणीसाठी निधी जमविण्यास सुरुवात झाली; काही भक्तांनी तर आपले आकडेही लगेच जाहिर केले. सुरुवातीस श्री. भाऊसाहेब तालीम यांनी आपल्या स्टुडिओतील एक हॉल मंदिरासारखा वापरण्यासाठी दिला होता. त्या जागेत असताना हे मंदिर आठवडयातून दोनच दिवस म्हणजे गुरुवारी सकाळी १२ वाजे पर्यंत व सायंकाळी ४ ते ८ पर्यंत व शुक्रवारी सायं. ४ ते ८ वाजेतो पर्यंत उघडे रहात असे. या मंदिरातील श्रीसाईंची मूर्ती श्री. तालीम यांनी केली.

स्वतंत्र मंदिर उभारण्यासाठी पन्नास हजार रु. ची गरज होती. तितके पैसे जमले नव्हते. अशातच एक संकट उभे राहिले.तालीम स्टुडिओची जागा मंदिराला पुढे वापरावयास मिळणार नव्हती, तेव्हा मंदिराला तात्पुरतीत जागेसाठी सोय करणे जरुरीचे होते. साईधामला जागा खाली करण्यासाठी जेव्हा मूळ मालकाकडून नोटीस मिळाली तेव्हा अवघे वीस हजार रु. तत्कालीन विश्वस्तांचे हाती होते. मंदिरासाठी जागेची शोधाशोध करता साईधामचे एक सभासद व जवळच्याच लाकूड कोळश्याच्या वखारीचे नामवंत मालक श्री काशिनाथ त्रिंबक दळवी यांना विनंती करुन त्यांच्या वखारीच्या एका भागात श्री साई बाबांची मूर्ती तात्पूरती तरी ठेऊन पूजा-अर्चा आरती करण्याची परवानगी मिळाली. भाविकांची तिथे अतोनात गर्दी होऊ लागली. त्यामुळे सहाजिकच श्री. दळवी यांना आपल्या उद्योग धंद्यात थोडा फार व्यत्यय येऊ लागला म्हणून त्यांनी मंदिर खाली करण्याची सूचना दिली. पुन्हा कार्यकर्त्यांचे जागा शोधण्याचे प्रयत्न सुरु झाले.

सुदैवाने डुआर्ट लेन मधील एका वृध्द खिश्चन स्त्रीने आपले रहाते घर व पहिला

मजला मालकी हक्काने देण्याचे कबूल केले. या व्यवहारासाठी छप्पन हजाराची गरज होती, पण जागा मिळते आहे तर ती घ्यावी असे ठरवून काही साईभक्तांनी सढळ हाताने आर्थिक सहाय्य करण्याचे ठरविले. रक्कम जमली व फेब्रुवारी १९६० रोजी इमारतीच्या मालकीणबाई श्रीमती व्हॅलेंटईन यांचे कडून रीतसर व्यवहार उभयपक्षी होऊन ती इमारत साईधामने ताब्यात घेतली. याच दिवशी सुविख्यात कलाकार व प्रख्यात ब्लॉक मेकर श्री. डी. डी. नेरॉय यांनी बाबांची भव्य तसबीर साईधामला भेट म्हणून दिली. शिर्डी येथे बाबांनी मशिदीचे मंदिरांत रुपांतर केले तर साईधामने ख्रिश्चन बाईच्या घरांत बाबांच्या मूर्तीची स्थापना करून घेतली. या ख्रिश्चन पद्धतीच्या इमारतीचा लौकरच कायाकल्प करण्यात आला. पंधरा-वीस हजार रुपये आणखी खर्च करून मंदिरास साजेशी अशी इमारत करून त्यात सुधारणा करण्यात आल्या. ही इमारत जनतेच्या नजरेस यावी म्हणून येथे खोल्यातून साई जीवन दर्शन घडविणारे रांगोळीचे प्रदर्शन भरविण्यात आले या प्रदर्शनातून कलाकारांनी भाग घेतला होता. या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन नामवंत नागरिक पुढारी श्री. स. का. पाटील यांनी केले होते. या ख्रिश्चन घरात मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी होम हवन इ. धार्मिक विधी करण्यात आले व १९६० साली चैत्र गुढी पाडव्याच्या दिवशी महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे शुभहस्ते मंदिराचे उद्घाटन झाले. मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी कै. संत तुकडोजी महाराज हजर होते.

साईधाममधील श्रीसाई मूर्ती मांडी घालून बसलेल्या अवस्थेत आहे. एक मांडी जमिनीवर स्थिर आहे तर दुसरी चरण कमल भूमीवर ठेवून उंचावलेली आहे. मूर्ती मोठी प्रसन्न असून तिच्याकडे टक लावून बघितले तर ती प्रत्यक्ष आपल्याशी जणू बोलतेच आहे, असे वाटते. मूर्तीचा एक हात लोडावर ठेवलेला आहे. पाठीमागे चांदीची प्रभावळ आहे. मस्तकावर चांदीची छत्री टांगलेली आहे. मूर्ती समोर पादुका आहेत. व जवळच दक्षिणा पेटी आहे. ही मूर्ती शिल्पकार श्री. बाळाजी वसंत तालीम यांनीच घडविली आहे. शिर्डीच्या मंदिरातील भव्य मूर्तीही याच तालीम साहेबांच्या हातची आहे. साईधाममधे रोज आरत्या होतात. रात्री दहा वाजता शेजारती व पहाटे पाच वाजतां काकड आरती होते. सायं. सहा वाजता संध्याकाळची आरती होते. या सर्व आरत्यांच्या वेळी भाविक मोठ्या संख्येने हजर असतात. मंदिरात वार्षिक उत्सव साजरे होतात. वैयक्तिक अभिषेक व श्री सत्यनारायणाच्या पूजाही होतात.

तालीम स्टुडिओनजिक औदुंबर वृक्षाखाली मंदिर बांधण्याची कै. केशवराव भोळे यांची इच्छा आता अशी पूर्ण झाली. या मंदिराच्या मागच्या बाजूला बगीच्यात दोन-तीन औदुंबराची रोपटी लावण्यात आली पण ती जगली नाहीत पण याच आवारात आपोआप जमीनीतून उगवून वर आलेले एक लहानसे रोपटे होते त्याचा

आज अति ऊंच असा वृक्ष झाला आहे. हा एक चमत्कार समजला जातो. आरतीच्या वेळी या वृक्षाचे खालीही आज आरती केली जाते.

साईबाबांच्या अनेक उद्दिष्टांपैकी मानवसेवा हीच ईशसेवा या ध्येयाने प्रेरित होऊन १९६१ साली चैत्र पाडव्याच्या सुमुहूर्तावर गरजू रोग्यांसाठी म्हणून साईधामने होमिओपॅथीक दवाखाना सुरू केला. डॉ. राजाध्यक्ष, डॉ. अनुसया घुमटकर, डॉ. मर्चंट इ. मोठी डॉक्टर मंडळी येथे नियमितपणे येतात व गरजूना मोफत सल्ला व औषधोपचार केले जातात. प्रौढास २५ व लहानास १५ पैसे नाममात्र फी घेतली जाते. मंदिराचे सभागृह भव्य असून तिथे एकावेळी पाचशे भक्त सहज बसू शकतात. सभागृहात वेळोवेळी शैक्षणिक चित्रपट दाखविले जातात. साईधामची कचेरी सभागृहाला लागूनच आहे. शिर्डी येथे बाबांनी प्रज्वलीत केलेली धुनी अखंड तेवत असते त्याप्रमाणे येथे नंदादीप अखंड तेवत असतो. असे हे मुंबापुरीतील श्रीसाईभक्तांचे श्रध्दास्थान प्रेक्षणीय आहे. श्री. दत्तात्रय भास्कर मालपेकर हे या साईधामचे गेली कित्येक वर्षापासून अध्यक्ष आहेत.

## मुंबई येथील रामनवमी उत्सव

रामनवमीच्या उत्सवासाठी दिनांक १–४–७४ला सकाळी साईनिकेतन, दादर येथे साईभक्त जमले होते. हरिभक्त परायण श्री. गुप्तेकाका ह्यांनी त्याप्रसंगी गोड आवाजात तन्मयतेने सुमारे दोन तास भजन गाऊन श्री साईबाबांची सेवा केली. तदनंतर श्री. साईबाबांची व श्रीरामाची पूजा अर्चा होऊन व आरती करून रामजन्माचा सोहळा साजरा करण्यात आला.

रामायण हा ग्रंथ समाजातील सर्व लहानथोरांच्या दृष्टीने कसा महत्वाचा आहे ह्याचे थोडक्यात विवेचन करून साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे ह्यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

# श्री साईनाथ महाराज ललितचरित्र

## (चालू लेखमाला)

र. श्री. पुजारी, (पुणे)

### (१४) लज्जा हीच की श्री बाबांचे चरणी मन रुजु होईना.

पोलिस जमादार गणेश दत्तात्रेय रात्रपाळीच्या ड्यूटीवर हजर झाले. हजेरी-पटावर सही करून हजर होण्याची वेळही त्यांनी घडयाळात पाहून नोंदली. मग खिशातील पोलिशी डायरी काढून, नेहमीच्या सवयींनुसार एकेक पान ते उलटू लागले. चोरी, खून, मारामारी, दरोडा, बळजबरी अशी कित्येक प्रकरणे डोळ्यापुढून भरभर सरकू लागली. जणू पोलिसांना रोज पाहावा लागणारा हा एक चित्रपटच !

हा हिडीस चित्रपट डोळ्यापुढे सुध्दा येणे नको म्हणून की काय जमादारांनी ती डायरी एकदमच मिटली. खिशात ठेवून दिली. उद्वेगाने स्वतःशी हसून ते म्हणाले: गणेश दत्तात्रेय! बाबा, काय हे तुझे खडतर नशीब ! सहस्त्रबुध्दे घराण्यातील कोठे ते तुझे पूर्वज आणि कोठे तू !"

मामलेदारीचे राज्य पिढयान्‌पिढया त्यांनी भोगले. समाजात मानसन्मान मिळवला. प्रतिष्ठा मिळविली. त्यांचाच कुलदीप तू,|आज कोणत्या स्थानावर आहेस! गुन्हेगारांच्या सहवासात नित्य राहून कसले ओंगळ पोलिशी जिणे आज वर्षानुवर्षे जगत आहेस!

समोरच्या स्टँडवर बंदुका होत्या. खुंट्यांना हातबेडया, काढण्या अडकविल्या होत्या. प्रसंगी पशूहूनही पशू होणाऱ्या फौजदारांची टेबल-खूर्ची यमाच्या दरबाराची आठवण देत होती. गुन्हेगाराला तपासात घेण्याची खोली काळसर्पाप्रमाणे विळखा घालून सावजाची वाट पाहात होती!

जमादार स्वतःशी म्हणाले : नरक नरक म्हणतात तो याहून काय निराळा! अपमान, मानहानी याशिवाय येथे एक दिवसही नाही. बेचाळीस कुळींच्या उध्दारा-विना कानावर दुसरा शब्द नाही.

शिक्षा होऊन मिळालेला तुरुंग एकवेळ परवडला. खाणे-पिणे-विश्रांती यांची ददात नाही. डोक्यावर टांगती तलवार नाही. चार पाट्या टाकल्या किंवा नेमून दिलेली खडी फोडली की दुसऱ्या दिवसापर्यंत शांतपणे झोपा ! लाथ घालून उठविण्यास कोणीहि तेथे येणार नाही !

मनाच्या या दुःखीकष्टी अवस्थेत जमादाराना एकदमच आपल्या सद्गुरुंची—

श्री वामनशास्त्री इस्लामपूरकरांची आठवण आली. डोळे भक्तिभावनेने भरून वाहू लागले.

जुन्या आठवणींशी समरस होऊन जमादार स्वतःशी बोलू लागले :

अपकारांची फेड उपकाराने करावी हा संतांचा स्वभाव. त्या स्वभावानुसार सद्गुरूंनी मला आपला मानले. अपराधाबद्दल शासन करण्याऐवजी गुरुपदेश दिला.

मी कोण ? मी एक यःकश्चित फटिंग पोलिस.

येईल-जाईल त्याची कुटाळकी करावी. त्याच्यावर लावणी, छक्कड अशी फटकळपणाची रचना करावी. चार टवाळ तरुण किंवा तमासगीर जमवावेत. कानाला हात लावून, मोठ्या रसिकतेने आल्यागेलेल्याला ते कवन गाऊन दाखवावे.

सद्गुरुंच्या दर्शनाच्या पहिल्या वेळीही मी याच टवाळखोर मनोवृत्तीच्या धुंदीत होतो.

त्यांना समक्ष पाहिलेले नसल्यामुळे त्या घरगुती खानावळीतील मित्रांसमोर अकलेचे तारे तोडून मी तेव्हा म्हणालो, "सरकारने कोण पंडित पाठविला आहे कोणास ठाऊक ! दोन दिवस झाले, स्वारीचा पत्ता नाही. इतक्या लांब स्टेशनवर फुकट हेलपाटे झाले. विद्वत्ता कोणी विचारावी ? पण सरकारी शास्त्री म्हणून डौल मात्र पाहून घ्यावा ! जुन्या ग्रंथांच्या रद्दीतून हे विद्वान काय रत्ने काढणार आहेत, ईश्वर जाणे !"

याच वेळी माझ्या समोर बसून शांतपणे भोजन करीत असलेले सद्गुरु हे सर्व कानाने ऐकत होते.

परंतु त्यावेळी किंवा त्यानंतरही माझ्या या प्रलापांबद्दल त्यांनी कोणताही भाव प्रकट केला नाही की एक अक्षरही उच्चारले नाही. उलट सरकारी हुकुमानुसार त्यांच्या दिमतीस राहून त्यांची सेवा-चाकरी उत्तम बजावल्याबद्दल ते मजवर प्रसन्न झाले.

आपले काम संपवून परत जाण्यास ते निघाले तेव्हा मोठ्या प्रेमाने मला जवळ बोलावून म्हणाले, "गणपतराव, तुम्ही फार साहाय्य केलेत. याकरिता पारितोषिक म्हणा किंवा तुमच्या-माझ्या भेटीची आठवण म्हणून म्हणा, तुम्हास काय देऊ ? माझ्या मनात ही अंगठी तुम्हास द्यावयाची आहे."

त्यांच्या मनाचा हा सरळपणा, प्रेमळपणा, उदारता, क्षमाशीलता पाहून माझे मन विरघळले. कृतकर्माचा मला पश्चाताप झाला. त्यांच्या पायावर डोके ठेवून गहिवरून मी म्हणालो, "मी आपला फार अपराध केला. असे असतानाही आपण

माझ्यावर थोडाही रोष दाखविला नाहीत. याहून दुसरे पारितोषिक काय पाहिजे ? आपण मला पदरात घ्यावे. उपदेश देऊन कृतार्थ करावे."

उपदेश ? कसला उपदेश ? शास्त्रीबुवांनी मला झिडकारून टाकण्याचा प्रयत्न केला. जणू ते त्या गावचे कोणी नव्हतेच !

माझ्या डोळ्यांसमोर मात्र त्या रात्रीचा प्रसंग उभा राहिला.

त्या रात्री शास्त्रीबुवांच्या खोलीत मी सहज डोकावून पाहिले. शास्त्रीबुवा शुचिर्भूत होऊन नित्याप्रमाणे पूजेस बसले होते. पूजा फारच तल्लिनपणे चालली होती. श्रीमत भागवताचे पारायण करीत असताना त्यांच्या मुद्रेवर अलौकिक तेज झळकत होते. भक्तिरसाच्या उद्रेकामुळे दोन्ही नेत्रातून प्रेमाश्रूंच्या धारा ओघळत होत्या.

मनाची इतकी सरळता, इतका समतोलपणा, एवढे सदाचरण आणि इतकी प्रशांत वृत्ती मी कोठेच पाहिली नव्हती. त्यामुळे ती दिव्य मूर्ती मी हृदयात साठवू लागलो. मनाशी म्हणालो : गुरुपदेश देण्यासाठी हा सत्पुरुष सर्वथैव योग्य असाच आहे. घेईन तर गुरुपदेश मी यांच्याकडूनच घेईन.

साहजिकच शास्त्रीबुवांनी झिडकारताच मी त्यांचे पाय घट्ट धरून ठेवले. त्यांना म्हणालो, "आपण मला आपले म्हटल्यावाचून मी हे पाय सोडणार नाही."

माझ्या या शब्दानी गुरुदेव प्रसन्न झाले. त्यांचे डोळेही अश्रूंनी भरून आले, यथाविधी मंत्रोपदेश करण्याचे त्यांनी मान्य केले.

गुरुदक्षिणा म्हणून एक महिन्याचा पगार उपदेश घेताना त्यांच्यापुढे ठेवावा असा विचार करून मी घरी निघालो. पण त्यांनी मला जाऊ दिले नाही. उलट हसत हसत ते म्हणाले, "अरे, एका पगाराने काय होते ? गुरुला सर्वस्व अर्पण करावे लागते. तशी तयारी आहे का ? जाऊ दे. तुझ्या सर्व नोकरीचीच मी गुरुदक्षिणा घेणार आहे. पण त्याला अवकाश आहे. कडोसरीला दोन पैसे आहेत ना ? तेवढे सध्या पुरेत."

सद्गुरुंची—माझी भेट त्यानंतर काय ती दोन तीनदाच झाली. एका भेटीत ते मला घेऊन पंढरीस गेले. दुसऱ्या खेपेस तर देह ठेवण्यासाठी काशीस जाताना अखेरचे भेटले.

जमादारांचे म्हणजे सद्गुरु श्रीवामनशास्त्रांच्या या 'दासगणू' चे डोळे अश्रूंमुळे पुन्हा अनिवार पणे वाहू लागले. तो विरहप्रसंग सद्गुरुंचे ते अखेरचे शब्द त्यांना जसेच्या तसे आठवू लागले.

सद्गुरुंनी आपल्या सेकंडक्लासच्या डब्यातून दासगणूंना भुसावळपर्यंत बरोबर नेले. हृदयीचे जे गहनगूढ रहस्य, ते त्यांच्या हृदयी आत्मबोधाप्रमाणे ठसविले. त्यांना

हृदयाशी घट्ट धरून पुनः पुनः कुरवाळले. त्यांच्या मस्तकावर आपल्या कृपायुक्त प्रेमाश्रूंचे अखंड सिंचन केले. आणि त्यांच्या विरहव्याकूळ मनाचे सांत्वन करीत ते म्हणाले–

"वेड्यासारखे दुःख करू नकोस. हा मुळी मृत्यूलोकच आहे. त्यातूनही मी नित्याचाच दुरावला आहे, अशी समजूत करून घेण्याचे कारण नाही. दोनतीनदा शिरडीस गेला होतास ना? श्रीसाईबाबा योग्य विभूति आहेत. त्यांना माझेच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोत. तेच येथून पुढे तुला मार्ग दाखवितील."

जीवनातील सर्व पोरकेपणा या विरहाच्या निमित्ताने जणू दासगणूंच्या वाटयास आला.

पुढे जेष्ठ वद्य ११ शके १८१८ रोजी श्रीवामनशास्त्री काशीस श्रीविश्वेश्वर चरणी विलीन झाले, ही बातमी ऐकून तर त्यांच्या कोमल मनावर वज्राघातच झाला।

कळवळून ते म्हणाले, "सद्गुरो, तुम्हाविना मी पूर्णपणे पोरका झालो.

"तुमच्या इच्छेनुसार शिरडीस गेलो. नानासाहेब चांदोरकरांनी श्रीचरणी मला रूजू केले पण प्रांजलपणे आत्मकथन करताना मनास लज्जा वाटते की श्रीबाबांचे चरणी माझे मन रुजू झाले नाही. नानासाहेबांच्या भिडेखातर पुनः पुन्हा गेलो, पण चित्त श्रीचरणी जडले नाही. पुढेही जडेल असे वाटत नाही."

"नानासाहेब पुन्हा येतील; शिरडीस चलण्याचा विषय पुन्हा काढतील. तेव्हा त्यांना मी काय सांगू काहीच सूचत नाही."

दासगणू चिंतामग्न झाले. दुःखी झाले.

नानासाहेबांसारख्या एका दिलदार, रसिक साईभक्ताचे मन मोडण्याचे त्यांच्या अगदी जिवावर आले.

स्वताःशीच काही वेळ विचार केल्यानंतर आतून कोणी त्यांना म्हणाले, "गणू, स्वतःचे भवितव्य ठरविणारा तू कोण? सद्गुरुंच्या हाती जीवनाचे सूत्र एकदा सुपूर्द केल्यानंतर तुझ्या कल्याणाची सर्व काळजी वहाणारे ते समर्थ आहेत. त्यांची आज्ञा पाळणे एवढेच तुझे काम. नानासाहेब पुन्हा येतील तेव्हा त्यांच्याशी एका शब्दानेही वाद घालू नको. मुकाटपणे त्यांच्याबरोबर जा आणि आणि श्रीसाईसमर्थांच्या चरणी मस्तक ठेवून म्हण : मी तुमचा दासानुदास आहे. मला पदरांत घ्या."

**(१५) नामरूपाने भिन्न भासले तरी सद्गुरु अंतर्यामी एकच होत.**

डावा हात मशीदमाईच्या कठड्यावर विसावून समर्थांची स्वारी दक्षिणेकडे तोंड करून बसली होती. धुनी नित्याप्रमाणे समोरच धगधगत होती. शामरावांच्या